# प्रकरण ३. सामाजीकरण


३.१ **सामाजीकरण**
- ३.१.१ सामाजीकरणाची संकल्पना
- ३.१.२ सामाजीकरणात शिक्षणाची भूमिका

३.२ **सामाजिक परिवर्तन**
- ३.२.१ सामाजिक परिवर्तनाची संकल्पना
- ३.२.२ सामाजिक परिवर्तनाची वैशिष्ट्ये
- ३.२.३ सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे घटक
- ३.२.४ सामाजिक परिवर्तनात शिक्षकाची भूमिका

३.३ **समूह संपर्क माध्यमे**
- ३.३.१ समूह संपर्क माध्यमांची संकल्पना
- ३.३.२ समूह संपर्क माध्यमांचे प्रकार
- ३.३.३ समूह संपर्क माध्यमांचे फायदे
- ३.३.४ समूह संपर्क माध्यमांच्या मर्यादा


## ३.१ सामाजीकरण

मानवाला एकाकी जीवन व्यतीत करणे शक्य नसते. तो समाजाचा एक घटक या नात्याने क्रियाशील असतो. तेच त्याचे जीवन असते; परंतु ते यशस्वी होण्यासाठी सामाजीकरणाची योग्य प्रक्रिया लहानपणापासूनच होण्याची आवश्यकता असते. मानवाला विकासाच्या अवस्थेकडे नेण्यासाठी, समाजाला स्थैर्य प्राप्त करून देऊन समाजाचे सुयोग्य संचालन होण्यासाठी, तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सामाजीकरण प्रक्रिया महत्त्वाची असते. व्यक्तीला आपले संपूर्ण जीवन समाजात व्यतीत करावयाचे असल्यामुळे व्यक्तीच्या दृष्टीने समाजाची सांगोपांग माहिती लहानपणी मिळवणे आवश्यक असते. ही प्रक्रिया सामाजीकरणामुळे घडत असते, म्हणजेच सामाजीकरण ही प्रक्रिया व्यक्ती आणि समाज यांना जोडणारा दुवा आहे.

### ३.१.१ सामाजीकरणाची संकल्पना

सामाजीकरणाची प्रक्रिया परस्परावलंबी अर्थात व्यक्ती आणि समाज यांच्यामध्ये घडणारी आहे. सामाजीकरणामुळे व्यक्तीचे समाजाच्या एका जबाबदार घटकामध्ये रूपांतर होते. समाजाचे रीतीरिवाज, मान्यतापूर्ण तत्त्व यांचे ज्ञान होऊन त्याचा आपल्या जीवनात स्वीकार केला जातो. समाजाचे मानदंड जाणून घेऊन त्यानुसार व्यवहार करण्याचे संस्कार सामाजीकरणामुळे होतात. व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास होण्यासाठी मुलांवर संस्कार घडवण्याची नितांत गरज असते. यासंबंधी जी काही सामाजिक, मानसिक प्रक्रिया आहे त्यास सामाजीकरण असे म्हणतात. मुलांना शिस्त लावणे, समाजामध्ये स्थान मिळवण्यासाठी महत्त्वाकांक्षा निर्माण करून त्यासाठी लागणारी कौशल्ये प्राप्त करून देणे, जबाबदारीची जाणीव निर्माण करणे अशा अनेक बाबी सामाजीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट असतात. व्यक्ती प्रथम कौटुंबिक वातावरणाशी, नंतर शैक्षणिक वातावरणाशी व शेवटी सामाजिक वातावरणाशी जुळवून घेत समाजमान्य होते. ही संपूर्ण प्रक्रिया म्हणजे सामाजीकरण होय.

**वॉटसन** यांच्या मते, ''सामाजीकरण ही एक सामाजिक आणि मानसशास्त्रीय प्रक्रिया होय.''

**हॅरी जॉन्सन** यांच्या मते, ''शिकणाऱ्याला सामाजिक भूमिका पार पाडण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देणारे शिक्षण म्हणजे सामाजीकरण होय.''

**सांगा पाहू**

सामाजीकरणाची सर्वसमावेशक व्याख्या सांगा.

### ३.१.२ सामाजीकरणात शिक्षणाची भूमिका

**ब्राऊन** यांच्या मते, शिक्षणामार्फत नियंत्रित वातावरणात मुलांमध्ये बदल घडवून आणले जातात. शाळेत मुलांचे सामाजीकरण औपचारिक पद्धतीमुळे योग्य रीतीने होते. यामध्ये शाळा व शिक्षक यांची जबाबदारी वाढते.

(१) शिक्षण हे व्यक्तीच्या सामाजीकरणाचे प्रभावी माध्यम आहे. भाषा हे आंतरक्रियेचे महत्त्वाचे माध्यम आहे आणि आंतरक्रिया सामाजीकरण घडवून आणते. सामाजीकरणासाठी इतरांचे विचार, भावना समजून घेणे व आपले विचार, भावना प्रकट करता येणे आवश्यक असते. प्रभावी भाषा शिक्षण, भाषेतून समाजातील चारित्र्यवान लोकांची माहिती, त्यातून मूल्ये व संस्कृती यांची ओळख होते.

(२) शिक्षणातून सामाजीकरण लोकशाहीप्रधान ठेवले जाते.

(३) शाळेतील सर्व सभासद, शिक्षक व विद्यार्थ्यांत सौहार्दाचे संबंध ठेवणे शिक्षणामुळे शक्य होते.

(४) शिक्षणामुळे नैतिक मूल्ये, नियम ज्ञात होतात, यांमुळे सामाजिक नियंत्रण राखले जाते. त्यातूनच मुलांचे सामाजीकरण होते.

(५) शिक्षणातून सामाजीकरण होताना समाजस्वास्थ्य राखण्यास प्राधान्य दिले जाते. समाजविघातक शक्तींशी संघर्ष करण्याची क्षमता विद्यार्थ्यांत शिक्षणातून निर्माण केली जाते.

(६) शिक्षणातून मुलांना सामाजीकरणासाठी आवश्यक असे ज्ञान, मूल्ये, कौशल्ये, दृष्टिकोन, सामाजिक अनुभव दिले जातात.

(७) शाळा व्यावसायिक शिक्षण देतात. पुढील व्यवसायाची तयारी शाळांमार्फत होते.

सामाजीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. समाजात जबाबदार नागरिक म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण होते. नवीन संकल्पनांचे यशस्वी अध्ययन होण्यासाठी, शिक्षण सकारात्मक सामाजीकरणातून प्रयत्न करते. नव्या व्यक्तीच्या अध्ययनासाठी योग्य प्रेरणा, बक्षीस, शिक्षा यांचा अवलंब केला पाहिजे. बालकाच्या योग्य सामाजीकरणासाठी शालेय वातावरण सामाजीकरणास पोषक असावे.

**चर्चा करा**

वर्तमानकालीन आधुनिक समाजातील व्यक्तीच्या सामाजीकरणात शिक्षणाची कोणती भूमिका असावी असे तुम्हांस वाटते याविषयी गटामध्ये चर्चा करा.

## ३.२ सामाजिक परिवर्तन

'बदल' हा मानवाचा स्वभावधर्म आहे. समाजरचनेच्या स्वरूपात बदल होतो. समाजात 'बदलणे' ही अंगभूत प्रक्रिया चालूच असते. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजात जाणीवपूर्वक बदल घडवून आणणे. व्यक्तीच्या वर्तनपद्धतीत किंवा जीवनात जो बदल घडतो तो बदल अर्थपूर्ण असून दीर्घकाळ टिकणारा असेल, तरच तो सामाजिक बदल होऊ शकतो. समाजाची रचना, समाजात घडणाऱ्या आंतरक्रिया, समाजात निर्माण होणारे नवनवीन विचारप्रवाह यांद्वारे सामाजिक बदल होणे म्हणजेच सामाजिक परिवर्तन होय.

### ३.२.१ सामाजिक परिवर्तनाची संकल्पना

सामाजिक परिवर्तन याचा अर्थ सामाजिक संस्था व आंतरसंबंध यांमध्ये बदल होणे. आधुनिकीकरण आणि भविष्याभ्यास यांचाही विचार सामाजिक परिवर्तनात महत्त्वाचा असतो.

समाजात होणारा कोणताही बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे, तर हा बदल संपूर्ण समाजरचनेत घडणे आवश्यक आहे. सामाजिक बदल हे कधी मंद, तर कधी जलद घडतात. काही बदल शांततामय मार्गाने होतात, तर काही हिंसक मार्गाने होतात.

- **सामाजिक परिवर्तनाची व्याख्या**

विचारवंतांच्या मते सामाजिक परिवर्तनाच्या विविध व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

(१) **डॉ. हॅरी जॉन्सन :** ''समाजरचनेत घडून येणारा बदल हा सामाजिक परिवर्तनाचा मूलभूत अर्थ होय.''

(२) **स्पेन्सर :** ''सामाजिक परिवर्तन म्हणजेच सामाजिक विकास होय.''

**लक्षात ठेवा**

'सामाजिक व्यवस्था म्हणजे परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी घटकांचा संच होय.' उदा., कुटुंब व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, शासन व्यवस्था.

**• सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया**

सामाजिक परिवर्तन होत असताना सामाजिक कार्ये, संरचना, सामाजिक संबंध इत्यादींमध्ये इष्ट बदल घडतो. समाजातील व्यक्तीच्या अभिवृत्ती, विविध आंतरक्रिया, वैचारिक स्वरूपामध्ये परिवर्तन घडून येते. समाजात सांस्कृतिक, सामाजिक संघटन यांमध्येही सकारात्मक बदल होत असतात.

उदा., पूर्वीच्या काळी पती आणि पत्नी यांचे नातेसंबंध वेगळ्या स्वरूपाचे होते. पती हा कुटुंबातील कर्ता व कमावता पुरुष या नात्याने कुटुंब चालवत असे. पत्नी गृहिणी या नात्याने चूल व मूल हीच कामे करत असे. पत्नीला शिक्षणाचे, सार्वजनिक जीवनाचे स्वातंत्र्य नव्हते; परंतु आता मात्र स्त्री ही शिक्षण, नोकरी, राजकारण, समाजकारण इत्यादी क्षेत्रांत स्वतंत्रपणे वावरताना दिसते आहे. तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढेच मर्यादित राहिलेले नाही. पतीपत्नी नातेसंबंधातील हा मूलभूत बदल म्हणजे 'सामाजिक परिवर्तन' होय.

### ३.२.२ सामाजिक परिवर्तनाची वैशिष्ट्ये

(१) सामाजिक परिवर्तन हे गतिशील असते.

(२) सामाजिक परिवर्तन विकासाच्या दृष्टीने अनिवार्य असते.

(३) सामाजिक परिवर्तन हे समाजाच्या बदलत्या गरजांनुरूप होते. बदलत्या आकांक्षा, गरजा पूर्ण करण्यासाठी नवे वातावरण, नवी साधने, नवी कार्यप्रणाली उदयास येते. या सर्वांमुळे सामाजिक परिवर्तन होते.


(४) तार्किक विचारांच्या आधारे परिवर्तन होणार हे निश्चित असते; परंतु त्याचे स्वरूप अनिश्चित असते.

(५) सामाजिक परिवर्तनाची संकल्पना मांडताना तुलनात्मक पद्धतीचा उपयोग करावा लागतो. तुलना केल्याशिवाय परिवर्तनाबाबत विधान करता येत नाही.

उदा., दोन समुदाय, दोन समाज, दोन कालखंड इत्यादी.

(६) सामाजिक परिवर्तनाला दिशा असते. म्हणजेच सामाजिक परिवर्तन हे प्रगतीच्या दिशेने किंवा अधोगतीने होऊ शकते.

### ३.२.३ सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे घटक




(१) **भौतिक घटक –** यामध्ये भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, मोठ्या आगी, भौगोलिक परिस्थिती इत्यादी भौगोलिक बाबींचा समावेश होतो.

(२) **राजकीय घटक –** जागतिक युद्धे, देशाला मिळालेले स्वातंत्र्य यांमुळे होणारे बदल

(३) **आर्थिक घटक –** देशाची व व्यक्तिगत आर्थिक स्थिती, दारिद्र्य, महागाई यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम

(४) **औद्योगिक घटक –** औद्योगिक क्रांती घडली व समाजात मोठे परिवर्तन घडून आले. उदा., औद्योगिकीकरणामुळे शहरीकरण व त्याचे परिणाम

(५) **शास्त्रीय व तंत्रज्ञानाधारित घटक –** वैज्ञानिक प्रगतीमुळे अनेक शास्त्रीय व तंत्रज्ञानाशी संबंधित सुधारणा झाल्या. या सर्व सुधारणा सामाजिक परिवर्तन जलद गतीने घडवण्यास साहाय्यभूत ठरल्या आहेत. उदा., यंत्रमानव, संगणक, आंतरजाल (इंटरनेट), संप्रेषण तंत्रज्ञान इत्यादी.

(६) **सामाजिक व सांस्कृतिक घटक –** आजच्या संगणक युगात नवनवीन सामाजिक, नैतिक व राजकीय मूल्यांचा उदय होतो. या सांस्कृतिक बदलांमुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. कधीकधी सामाजिक परिवर्तन महान व्यक्तींमुळेही घडून येते. उदा., डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. पंजाबराव देशमुख

(७) **वाहतुकीची साधने –** आज आधुनिक जगात वाहतुकीच्या जलद साधनांमुळे सामाजिक जीवनाला गती मिळाली आहे.

(८) **सामाजिक परंपरा, मूल्ये व कायदे –** फ्रान्स, चीन व रशियामधील क्रांतीमुळे तेथील समाजरचनेत परिवर्तन झाले. कायदे करूनही समाज परिवर्तन करता येते.

(९) **चळवळी –** समाजात निर्माण होणाऱ्या विविध चळवळींमुळेही सामाजिक परिवर्तन होते. उदा. चलेजाव चळवळ, दलित चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ. गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, महात्मा फुले यांनी समाजसुधारणाविषयक चळवळी करून महाराष्ट्रातील समाजास नवे वळण लावले.

(१०) **लोकसंख्याविषयक घटक –** लोकसंख्या हा घटक स्थिर स्वरूपाचा नसून तो सतत कमीअधिक होत असतो. म्हणजेच लोकसंख्येच्या रचनेचा प्रभाव सामाजिक परिवर्तनावर विशेषत्वाने असतो. उदा. स्त्रीपुरुष प्रमाण कमीअधिक होताच रीतीरिवाज, प्रथा यांमध्ये बदल होतात.



**इंटरनेट माझा मित्र**

★ इंटरनेटच्या साहाय्याने सामाजिक परिवर्तनाच्या इतर घटकांचा शोध घ्या.

★ इंटरनेटच्या साहाय्याने आपणांस माहीत असलेल्या कोणत्याही दोन समाजसुधारकांच्या कार्याची माहिती मिळवा.

### ३.२.४ सामाजिक परिवर्तनात शिक्षकाची भूमिका

शाळेद्वारे होणाऱ्या सामाजिक परिवर्तनात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. सामाजिक परिवर्तनात शिक्षक पुढीलप्रमाणे भूमिका बजावतात.

(१) विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुखता व परिवर्तनाचा दृष्टिकोन जागृत व्हावा. वैचारिक वृत्तीमुळे त्याज्य रूढी, परंपरा टाळून नवीन विचार, रूढी रुजवण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे.

(२) विद्यार्थ्यांमध्ये वैचारिकता व सर्जनशीलता विकसित करण्यावर शिक्षकाने भर द्यावा. त्यातूनच तो समाजात इष्ट व योग्य बदल घडवून आणेल.

(३) शिक्षक हा विद्यार्थ्यांमध्ये समाज परिवर्तनासाठी आवश्यक असलेली अभिवृत्ती, दृष्टिकोन, विचार करण्याचे कौशल्य निर्माण करू शकतो.

(४) शिक्षक हा विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन कौशल्यांचा विकास घडवून आणू शकतो. या अध्ययन कौशल्यांमुळे विद्यार्थी आजन्म नवनवे ज्ञान व कौशल्ये प्राप्त करू शकतो.

(५) शिक्षक हा विद्यार्थ्यांमध्ये नवीन सामाजिक व्यवस्थेनुसार सामाजिक व नैतिक मूल्यांचा विकास, तसेच शास्त्रीय दृष्टिकोनाचा विकास घडवून आणू शकतो.

(६) शिक्षक आर्थिक विकासासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने मदत करू शकतो.

(७) शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे उपक्रम, प्रकल्प आणि अभ्यासक्रम यांमधून विविध कौशल्ये निर्माण करावीत.

(८) लोकशाहीयुक्त वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करण्यात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते.

## ३.३ समूह संपर्क माध्यमे

### ३.३.१ समूह संपर्क माध्यमांची संकल्पना

आजच्या विज्ञान युगात औपचारिक शिक्षणाबरोबर अनौपचारिक शिक्षणातूनही व्यक्ती ज्ञान व अनुभव घेत असते. समूह संपर्क माध्यमे ही केवळ मनोरंजन करतात असे नव्हे, तर निरनिराळ्या विषयासंबंधी माहिती देतात. मोबाईल, इंटरनेटसारख्या साधनांमुळे एकाच वेळी एका ठिकाणाहून अनेक व्यक्तींशी संपर्क साधता येतो. जगातील एखादी घटना तात्काळ दुसऱ्या ठिकाणी समजू शकते. समूह संपर्क माध्यमांना समाजशिक्षणात फार महत्त्व आहे. साक्षर, निरक्षर, बालक, युवक, स्त्रीपुरुष, शेतकरी, कलाकार, उद्योगपती इत्यादी सर्वांना उपयुक्त ठरेल, अशा प्रकारचे ज्ञान व माहिती दिली जाते. अनेक घडामोडींची, नैसर्गिक संकटांची माहिती मिळते. विविध शोध, संशोधने, नाटक, सिनेमा, मालिका इत्यादींच्या माहितीची विविधता प्रसार माध्यमातून दिसून

येते. बोधकथा, आरोग्य, योग इत्यादींसारख्या जीवनाला आवश्यक गोष्टींचीही दखल घेतली जाते. समूह संपर्क माध्यमांमुळे वेळ व पैशांची बचत होऊन माहिती, ज्ञान, मनोरंजन उपलब्ध होते.


'एकाच वेळी व्यक्ती, तसेच समूहाशी यशस्वीपणे प्रभावीपणे संपर्क प्रस्थापित करणारी माध्यमे म्हणजे समूह संपर्क माध्यमे होय.'

'ज्या माध्यमांद्वारे एकाच वेळी अधिकाधिक व्यक्तींपर्यंत काही कल्पना, अभिवृत्ती, मते इत्यादी संप्रेषित करता येतात, त्यास समूह संपर्क माध्यमे असे म्हणतात.'

**माहीत आहे का तुम्हांला?**

१५ व्या शतकाच्या उत्तरार्धातील छापखान्यांच्या शोधामुळे समूह संपर्क माध्यमांना प्रथम चालना मिळाली व पुस्तके आणि वर्तमानपत्रे मोठ्या प्रमाणात प्रकाशित होऊ लागली. १९२० साली 'मिडिया' हा शब्द प्रचलित झाला. समूह संपर्क माध्यम ही संकल्पना पूर्वी मुद्रित माध्यमापुरती मर्यादित होती; परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर दूरदर्शन व आकाशवाणी या साधनांची ओळख झाली. त्यानंतरच्या काळात ही साधने लोकप्रिय झाली. सध्या इंटरनेट हे सर्वाधिक लोकप्रिय समूह संपर्क माध्यम आहे.

### ३.३.२ समूह संपर्क माध्यमांचे प्रकार




### (१) मुद्रित साहित्य माध्यमे

**(१) वर्तमानपत्रे** – वर्तमानपत्रे हे आपल्या दैनंदिन जीवनाचा आरसाच समजण्यात येतात. वर्तमानपत्रे हे लोकशिक्षणाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. ते जाहिरातीचे उत्तम साधन समजले जाते. हे एक शिक्षणाचे अनौपचारिक माध्यम आहे.

- **वर्तमानपत्राचे फायदे**

(१) लोकमत तयार करण्याचे कार्य वर्तमानपत्र करीत असते.

(२) थोरपुरुष, राजकारणी, उद्योगपती यांचे व आपापले विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याचे ते एक माध्यम आहे.

(३) सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात वर्तमानपत्रे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

(४) राष्ट्राची आर्थिक बाजू, उत्पादन आणि राष्ट्रीय आवक यांची माहिती पुरवण्याचे कार्य करतात.

(५) बालकांचे ज्ञान संवर्धन करतात.

(६) जनतेच्या सामान्य ज्ञानात वाढ होते.

(७) माध्यमिक स्तरावर परीक्षेस उपयुक्त सामग्रीसुद्धा प्रकाशित करण्यात येते.

**(२) नियतकालिके** – नियतकालिकांचे स्वरूप व कार्यपद्धती बऱ्याच बाबतीत वर्तमानपत्रासारखीच असते. सद्य:स्थितीतील छापील प्रसार माध्यमात नियतकालिकांचे महत्त्व निश्चित उल्लेखनीय आहे. नियतकालिके ही ठरावीक कालावधीने प्रकाशित होत असतात. त्यांच्या प्रकाशनाच्या कालावधीवरून त्यांचे साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक, वार्षिक असे प्रकार पडतात. वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यांमध्ये बरेचसे साम्य असले, तरी एक महत्त्वाचा फरक म्हणजे वर्तमानपत्रात असलेला दैनिक बातम्यांवरील भर नियतकालिकांमध्ये नसतो.

- **नियतकालिकांचे फायदे**

(१) छापील रूपात कायमस्वरूपी माहिती मिळत असल्याने हवे तेव्हा व हवे तितक्या वेळा पाहता येते.

(२) नियतकालिकेही वर्तमानपत्राप्रमाणे लोकप्रबोधनाचे माध्यम ठरू शकतात.

(३) बऱ्याच नियतकालिकांना ऐतिहासिक पार्श्वभूमी व प्रतिष्ठा लाभलेली असते.

(४) नियतकालिके ही बहुधा विशिष्ट विषयांना वाहिलेली असतात.

(५) वर्तमानपत्राइतके नसले, तरी मर्यादित नियतकालिकांमध्येही जाहिरातींना स्थान असते.

(६) नाटक, सिनेमा, दूरदर्शन यांच्यावरील समालोचने आणि पुस्तक परीक्षणे यांमुळे नियतकालिकांचेही प्रसार माध्यमांचे मूल्य वाढते.

(७) शैक्षणिक, वैद्यकीय, वैज्ञानिक व तंत्रज्ञानविषयक नियतकालिकांच्या माध्यमातून संशोधनपर ज्ञान प्रसारित होत असल्याने त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या दृष्टीने व संशोधकांसाठी नियतकालिके महत्त्वाची ठरतात.

**(३) पुस्तके** – ज्ञानसाधनेतील पुस्तकांचे महत्त्व लक्षात घेऊन ''ग्रंथ हेच गुरू'' अशी उक्ती प्रसिद्ध आहे. ज्ञान भांडाराचे माध्यम म्हणून पुस्तके ही खूप प्राचीन काळापासून मानवाला सहयोगी ठरत आली आहेत.

- **पुस्तकाचे फायदे**

(१) पुस्तके ज्ञान भांडार खुले करण्याचे कार्य करतात.

(२) जीवनोपयोगी अन्य माहितीही पुस्तकरूपाने संग्रहित केलेली असते.

(३) पुस्तके सार्वजनिक संप्रेषणही प्रभावीपणे करतात.

(४) पुस्तकांच्या रूपाने एखादा विचार अनेक वाचकांपर्यंत पोहचवता येतो.

(५) शासकीय प्रचार यंत्रणेसाठी पुस्तके उपयुक्त ठरतात.

(६) पुस्तकांच्या माध्यमातून चांगले लोकशिक्षण देता येते.

(७) टेलिफोन डिरेक्टरी, रेल्वे व एस.टी. वेळापत्रक, पुस्तिका, शासकीय राजपत्र, वार्षिक अहवाल इत्यादी पुस्तके ही सार्वजनिक संप्रेषणासाठी उपयुक्त असणारी प्रसार माध्यमे आहेत.

**(४) विश्वकोश** – विश्वकोशाला ज्ञानकोश असेही म्हणतात. विश्वकोश संदर्भग्रंथ म्हणून ओळखला जातो. ग्रंथालयात विश्वकोश ठेवण्याकरिता स्वतंत्र स्थान असते. काही विश्वकोश खंडामध्ये असतात, काही विश्वकोश हे सामान्य ज्ञानाशी संबंधित असतात, तर काही विशिष्ट विषयाशी संबंधित असतात. विश्वकोश व्यक्तिगत लेखकाने लिहिलेला नसतो; परंतु तो अनेक व्यक्तींच्या सहयोगाने तयार झालेला असतो. आंतरजालवर उपलब्ध असलेला विकीपिडिया हा एक प्रकारचा विश्वकोशच होय. विश्वकोशामध्ये एखाद्या घटनेसंबंधी, व्यक्तीसंबंधी व संकल्पनेसंबंधी सविस्तर माहिती दिलेली असते. विश्वकोशामार्फत संपूर्ण माहिती अभ्यासकापर्यंत व जनसामान्यांपर्यंत पोहोचवता येते.

- **विश्वकोशाचे फायदे**

(१) विश्वकोशाच्या आधारे आवश्यक ती माहिती त्वरित मिळवता येते.


(२) विश्वकोशातून विस्तृत स्वरूपात माहिती प्राप्त होते.

(३) विश्वकोश सहज उपलब्ध होऊ शकतो.

(४) विश्वकोशामध्ये लिहिलेला मजकूर अकारविल्हे प्रमाणे (अल्फाबेटिकल) असल्यामुळे हवी असलेली माहिती शोधता येते.

### (२) प्रसारण माध्यमे

**(१) आकाशवाणी** – आकाशवाणी हे खेडोपाडी ज्ञान पोहोचवण्याचे एक श्राव्य साधन आहे. त्यास




सहज शिक्षणाचे प्रभावी साधन म्हणून समजण्यात येते. या साधनाच्या माध्यमातून अनेक समाजशिक्षणाचे कार्यक्रम प्रसारित होतात. ज्यांनी अर्धवट शिक्षण घेतले आहे, जे अर्थार्जन करताना शिक्षण घेऊ इच्छितात त्यांच्यासाठीसुद्धा विविध कार्यक्रमाद्वारे माहिती देण्यात येते. त्यासाठी निरंतर शिक्षणाची व्यवस्था करण्यात येते. एकाच वेळी अनेक लोक कार्यक्रम ऐकू शकतात. शालेय पाठांवर आधारित तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांच्या कौशल्यपूर्ण अध्यापनाचे सादरीकरण ऐकवले जाते. भाषेत शब्दोच्चार कसे करावेत याची माहिती मिळते. आकाशवाणीचे कार्यक्रम ऐकल्याने मानसिक ताण कमी होतो, मनोरंजनही होते व श्रमपरिहार घडून येतो. बातम्यांमुळे देशातील व जगातील घडणाऱ्या घडामोडींची माहिती श्रोत्यांना उपलब्ध होते.

(२) **दूरदर्शन –** दूरदर्शनवर दाखवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांतून मनोरंजनाशिवाय अनौपचारिक व सहज शिक्षण दिले जाते. या साधनाद्वारे कमी




वेळेत अधिकाधिक उपयुक्त माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येते. चांगल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना एकदम मिळू शकतो. दूरदर्शनवर अभ्यासपूरक कार्यक्रम किंवा दुर्मिळ प्राण्यांची आणि आरोग्यविषयक माहिती दाखवतात. शिक्षणविषयक पाठांचे चित्रीकरण करून त्याचे दूरदर्शनवरून प्रसारण केल्यास विद्यार्थ्यांना कमी वेळात जास्त माहिती मिळते व त्यांचे मनोरंजन होते. प्रत्यक्ष डोळ्यांना न दिसणाऱ्या क्रिया यामुळे पाहता येतात, तसेच साक्षरता प्रसार, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य शिक्षण, राष्ट्रीय एकात्मता अशा प्रकारचे सहज शिक्षणही मिळते. दूरदर्शनद्वारे मुक्त विद्यापीठाचेही अनेक कार्यक्रम प्रक्षेपित केले जातात. उदा. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU) याशिवाय दूरदर्शनद्वारे विज्ञान, शेतीविषयक, योगासंबंधी कार्यक्रम प्रादेशिक भाषेत प्रसारित केले जातात.

(३) **चित्रपट –** चित्रपटांमुळे मनोरंजनासोबत सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता, आंतरराष्ट्रीय सामंजस्य साधण्यास मदत होते. या माध्यमाद्वारे



समाजमनावर अधिक प्रभावतर पडतोच; पण परिणामही अधिक प्रमाणात होत असतो. काही चित्रपट विद्यार्थ्यांवर उदात्त संस्कार निर्माण करीत असतात. त्याचप्रमाणे समाजावरही आपला प्रभाव पाडतात. सामाजिक, ऐतिहासिक व धार्मिक चित्रपट विद्यार्थ्यांच्या मनावर अतिशय प्रभाव पाडत असतात. काही चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर संस्कारक्षम प्रभाव पाडतात. नैतिक मूल्ये आणि आदर्शांचे पोषण करण्यासाठी चित्रपटांचा चांगला फायदा होऊ शकतो. चित्रपटांमुळे विद्यार्थ्यांच्या अभिनयक्षमतेला योग्य संधी मिळते. विज्ञान, सामाजिक शास्त्रे, वैद्यकीय विषयावर चित्रपटाद्वारे माहिती देऊन योग्य प्रकारे शिकवता येते.

### (३) वेब माध्यमे

(१) **आंतरजाल (इंटरनेट) –** आंतरजाल ही महत्त्वाची सुविधा आपल्याला संगणक क्षेत्रातून मिळालेली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आंतरजाल सुविधेने क्रांती घडवून आणली आहे. आंतरजालने



ज्ञानाचा महासागर उपलब्ध करून दिला आहे. अमर्याद माहितीचा साठा आपल्याला आंतरजालमुळे प्राप्त होतो. जगभर परस्पर संप्रेषणासाठी आंतरजालने खूपच सोय करून दिली आहे.

ई–मेल (Electronic Mail) हा इंटरनेटचा सर्वाधिक लोकप्रिय असा उपयोग आहे. F.T.P. आणि Telnet F.T.P. ह्यादेखील आंतरजालवर नित्याच्या गोष्टी झाल्या आहेत. F.T.P.चा अर्थ File Transfer Protocol होतो, यामुळे संगणकावरून फाईल्सचे स्थानांतरण करणे शक्य होते. Telnet मुळे अन्य संगणकांशी संबंध जोडता येतो.

- **आंतरजालचे फायदे**

(१) या सुविधेमुळे आपल्याला हवी असलेली माहिती शोधून मिळवता येते.

(२) Net News सुविधेमुळे कोणालाही एखाद्या विषयावरील माहिती अथवा लेख आंतरजालवर प्रस्थापित करता येतात.

(३) व्यापार, सेवाविषयक खरेदीविक्री व पुरवठा इत्यादी व्यवहारात आंतरजालचा उपयोग होतो.

(४) परीक्षेचे आवेदन या माध्यमाद्‌वारे केले जाऊ शकते.

(५) परीक्षेचे परिणाम या माध्यमाद्‌वारे प्राप्त केले जाऊ शकतात.

(६) कोणत्याही प्रकारची परीक्षा कोठेही या माध्यमाद्‌वारे दिली जाऊ शकते.

(७) विविध प्रकारचे खेळ आणि पुस्तके आंतरजाल माध्यमांवर उपलब्ध होतात.

(८) शिक्षणक्षेत्रात विशेष करून संशोधन कार्यासाठी संदर्भ शोधण्यासाठी आंतरजाल खूप मौल्यवान ठरते.

(९) संकेतस्थळांचादेखील आवश्यक माहिती मिळवण्यासाठी उपयोग होतो.

**(२) दूरपरिषद –** दूरपरिषद हे एक इलेक्ट्रॉनिक साधन आहे. यामध्ये पुढील प्रकार आहेत.

(१) चित्रित परिषद (Video Conferencing)

(२) श्राव्य परिषद (Audio Conferencing)

(३) श्राव्य लेखचित्रित परिषद (Audio Graphic Conferencing)

(४) संगणक परिषद (Computer Conferencing)

दूरपरिषद एका विषयावर चर्चा करायला दोन अथवा दोनपेक्षा अधिक विविध स्थानांवर उपस्थित



असलेल्या दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तींमध्ये एकाच वेळेस संप्रेषण प्रस्थापित करू शकते. दूरपरिषदेलाच 'दूरसंभाषण प्रणाली' असेदेखील म्हणतात.

या माध्यमांद्‌वारे अभिलेख दस्तऐवज व संगणकावर प्राप्त सूचनांचे आदानप्रदान केले जाऊ शकते. दूरपरिषदेसाठी आंतरजालशी जोडलेला संगणक, व्हिडिओ कॅमेरा, माइक्रोफोन, स्पीकर, प्रोजेक्टर, टीव्ही किंवा मॉनिटर आवश्यक असते.

आजकाल या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग न्यायालयात साक्ष देण्याकरिता, विविध कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याकरिता होत आहे. विश्वविद्यालयामध्ये आधुनिक शिक्षण प्रणालीच्या आवश्यकतेला अनुसरून दूरपरिषद अमलात आणली जाते. भारतासोबत अनेक देशांत सरकारी बैठका आणि कार्ये या माध्यमाद्‌वारे होत आहे.

- **दूरपरिषदेचे फायदे**

(१) दूर शिक्षणासाठी विशेषरूपात उपयोगी माध्यम होऊ शकते.

(२) विद्यार्थी आणि शिक्षक यांना परस्परांकडून प्रत्याभरण घेता येते.

(३) शिक्षक व विशेष तज्ज्ञांबरोबर सहजगत्या संपर्क स्थापित करण्यास मदत होऊ शकते.

(४) विखुरलेल्या जनसंख्येकरिता हे उपयोगी आहे.

(५) दूरपरिषद ही छोट्या किंवा मोठ्या समूहांना कार्य करण्याकरिता अनुकूल बनवू शकते.

(६) वेळेचे व्यवस्थापन करण्यास मदत होते.

(७) दूरपरिषद माहितीची, अनुभवांची देवाणघेवाण, अहवाल लिहिणे, सर्वेक्षण, संयुक्त संशोधन इत्यादींसाठी एक चांगले माध्यम आहे.

(८) विविध क्षेत्रांमध्ये संबंधित नवीन सूचना आणि अनुभव प्राप्त करण्याकरिता मदत करतात.

(९) वेळ आणि पैशाची (खर्चाची) बचत होते.

**(३) अनुदिनी (ब्लॉग) –** वेब लॉग या शब्दांचे जनक जॉर्न बारजर आहेत. ब्लॉग लिहिणाऱ्याच्या नावाने




ब्लॉग ओळखला जातो. जे काम ब्लॉगवर केले जाते त्याला ब्लॉगिंग म्हणतात. ब्लॉग ही एक विशिष्ट प्रकारची वेबसाईट असते. विचार करणारा आणि ते इतरांना सांगण्याची इच्छा असलेला, कोणीही आपला ब्लॉग करू शकतो आणि सहजपणे आपले विचार प्रकाशित करू शकतो.

बहुतेक ब्लॉग हे ऑनलाईन डायरीच्या स्वरूपात असतात. हा एक विरोधाभास आहे. डायरी ही अत्यंत खासगी असते, तर ब्लॉग्स अगदी जगजाहीर, सर्वांना वाचता येण्यासारखे असतात. ब्लॉगवर मात्र प्रत्येक नवीन नोंद सगळ्यात वर जाते, त्यामुळे ब्लॉगवर येणाऱ्या कोणालाही नवीन गोष्टी आपोआप दिसतात. ब्लॉग हे एक दृकश्राव्य माध्यम आहे. ब्लॉग हे एक प्रकारचे संकेतस्थळ किंवा संकेतस्थळाचा भाग आहे. स्वत:चे विचार, एखाद्या कार्यक्रमाची नोंद, माहिती, रेखाचित्र व चित्रफिती, संगीत व आवाज यांसारख्या गोष्टी ब्लॉगच्या माध्यमातून सगळ्यांपर्यंत पोहचवता येते.

- **अनुदिनीचे (ब्लॉग) फायदे**

(१) आपले ज्ञान व अनुभव यांची देवाणघेवाण करता येते.

(२) आपल्या आवडीच्या विषयांमध्ये आपली मते व्यक्त करता येतात.

(३) समविचारी लोकांशी संपर्क साधता येतो.

(४) काहीही खर्च न करता आपले स्वत:चे लेखन जगासमोर मांडता येते.

(५) कोणत्याही भाषेत लिहू शकता.

(६) ब्लॉग तयार करण्यासाठी कोणाचीही परवानगी लागत नाही.

(७) एका ब्लॉगवर कितीही लेख लिहिता येतात.

(८) ब्लॉग कधीही आपोआप डिलिट होत नाही.

(९) सर्व माध्यमे एकाच वेळेस वापरून एखाद्या कौटुंबिक सहलीचा अल्बम किंवा एखाद्या चित्रपटाचे परीक्षण इत्यादी अत्यंत आकर्षक प्रकारे प्रसिद्ध करता येते.

(१०) आपल्या नेहमीच्या कार्याला हातभार लावला जातो.

**(४) मिडिया संचयिका (पॉडकास्ट)** – केवळ लिहिणे व वाचण्याने आपले ज्ञान वाढत नाही, तर विविध माहिती प्राप्त करण्याकरिता आपण यू-ट्युबचा वापर करतो; परंतु आता आपण हळूहळू काही गोष्टी फक्त ऐकणे पसंत करतो. ऐकण्याकरिता विविध साधनांचा उपयोग केला जातो. त्यातील एक माध्यम म्हणजे पॉडकास्ट आहे. पॉडकॉस्टचा अर्थ 'मिडिया संचयिका' आहे. संचयित (stored)




डेटाला ऑडिओ फाईलच्या आयपॉड किंवा मिडिया प्लेअरच्या माध्यमांद्वारे ऐकू शकतो. अशी विविध संकेतस्थळे आहेत, जी अनुच्छेद (articles) आणि चित्रण (videos) यांच्याव्यतिरिक्त पॉडकास्ट संचार (media), फाईल्स (दस्तऐवज) अपलोड करतात. या फाईल्स युझर वेबसाइटने डाऊनलोड करून आपल्या संगणकावर किंवा अन्य ऑडिओ प्लेअरवर लावून ऐकू शकतात. या प्रक्रियेला पॉडकास्टिंग म्हणतात. जी व्यक्ती या प्रकारची ऑडिओ फाईल तयार करतो त्याला पॉडकास्टर म्हणतात.

- **मिडिया संचयिकेचे (पॉडकास्ट) फायदे**

(१) पॉडकास्टद्वारे तुम्ही लोकांना चांगले कार्य करण्याकरिता प्रोत्साहित करू शकता.

(२) तुम्ही जर चांगले लेखक किंवा गायक असाल, तर तुम्ही पॉडकास्टचा उपयोग करू शकता.

(३) प्रवासामध्ये आपण पॉडकास्टद्वारे विविध कार्यक्रम ऐकू शकतो.

(४) विविध भाषांमध्ये बोलून आपण हव्या असलेल्या माहितीचा शोध घेऊ शकतो.

**(५) भ्रमणध्वनी (मोबाईल)** – भ्रमणध्वनी १९६९ साली जपानमध्ये प्रथम वापरात आले; परंतु



१९९८ साली समूह संपर्क माध्यम म्हणून उदयास आले. भ्रमणध्वनी हे एक आंतरक्रिया घडवून आणणारे माध्यम आहे. याचे मूळ वैशिष्ट्य असे, की ते आपल्याबरोबर हवे तेथे घेऊन जाता येते व कायम जोडणीत असते.

- **भ्रमणध्वनीचे फायदे**

(१) त्वरित संपर्क साधता येतो.

(२) हाताळण्याकरिता सोपे आहे.

(३) हवे असेल तेव्हा उपलब्ध होतो.

(४) हा बहुपयोगी आहे. जसे – रेकॉर्डिंग करणे, मेसेज पाठवणे, निमंत्रण देणे इत्यादी सहज शक्य होते.

### ३.३.३ समूह संपर्क माध्यमांचे फायदे

**(१) प्रत्यक्ष दृश्याद्वारे अनुभव घेता येतो** – केवळ ऐकीव माहितीपेक्षा प्रत्यक्ष अनुभवांद्वारे मिळणारी माहिती ही दीर्घकाळ स्मरणात राहते व आकलनासाठी सुलभ होते.

**(२) तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा लाभ** – उत्कृष्ट व तज्ज्ञ शिक्षकांचा लाभ केवळ मोजक्या विद्यार्थ्यांनाच होत नाही, तर एकाच वेळी लाखो विद्यार्थ्यांना घेता येतो.

**(३) समूह शिक्षण** – समूह शिक्षणासाठी संपर्क माध्यमांची महत्त्वाची भूमिका असते. याद्वारे समाजाला नवी मूल्ये, नवे विचार मिळतात.

**(४) संस्कृती दर्शन** – दूरदर्शनमुळे कोणत्याही समाजाची संस्कृती त्यांच्याच शैलीत दाखवता येते. उदा. आदिवासी संस्कृतीचे जीवन, त्यांच्या प्रथा, परंपरा, राहणीमान, आहार या सर्वांची माहिती दूरदर्शनमुळे स्पष्ट होते.

**(५) विविध प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन** – जगात अनेक अद्‌भूत व रम्य प्रेक्षणीय स्थळे आहेत. प्रत्येक स्थळाची वेगवेगळी वैशिष्ट्ये असतात. सर्व ठिकाणी जाऊन त्या स्थळाची अनुभूती घेणे उत्तमच; परंतु सर्व ठिकाणी जाणे शक्य नसते.

**(६) संस्कृती संक्रमण व संवर्धन** – धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांविषयी उपयुक्त व वास्तव माहिती देऊन धर्म आणि संस्कृतीची जोपासना करण्यात प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

**(७) दूरस्थ शिक्षण** – आज ज्ञानगंगा घरोघरी पोहोचली आहे. काही कारणास्तव शिक्षण न होऊ शकलेल्या, शाळेत जाण्याची संधी न मिळालेल्या लोकांनी निराश होण्याचे कारण नाही. दूरदर्शन अशा व्यक्तींसाठी खास शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करते.

**(८) राष्ट्रीय नेत्यांचे संदेश** – काही महत्त्वाच्या प्रसंगी जसे, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन किंवा अचानक गंभीर परिस्थिती उद्‌भवल्यास राष्ट्रीय नेते विशेषत: पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री किंवा राज्यपाल देशाला व राज्याला उद्देशून आवाहन करतात किंवा संदेश देतात. दिल्ली व राज्यातील राजधानीमधून केलेले आवाहन सर्वसामान्यांपर्यंत या माध्यमांद्वारे पोहोचू शकते.

**(९) बातम्या** – या माध्यमांमुळे जगभरात घडलेल्या घटनांची माहिती मानवाला घरबसल्या होते. राज्यातील, देशातील प्रमुख घटना ताबडतोब समजतात. इतकेच नव्हे, तर काही बातम्यांची सत्यता दृश्यावरून पडताळणे ताबडतोब शक्य होते. उदा., संपकाळात शहरामधील परिस्थिती कशी होती. महत्त्वपूर्ण सभेस किती लोक उपस्थित होते. इतकेच नव्हे, तर त्यांचे कथन त्यांच्याच शब्दांत ऐकायला मिळते. मध्यंतरी संसदेचे कामकाज दूरदर्शनवरून प्रसारित होत होते, त्यामुळे राजकीय कार्याचा प्रत्यक्ष परिचय होतो.

**(१०) मनोरंजन** – समूह संपर्क माध्यमांची निर्मितीच मनोरंजनासाठी झाली आहे, त्यामुळे मनोरंजनासाठी तऱ्हेतऱ्हेचे विविध आकर्षक कार्यक्रम असतात. या मनोरंजक कार्यक्रमातून शर्करावगुंठित औषधी गोळीप्रमाणे ज्ञानामृत देता येते. स्वच्छतेचे महत्त्व, व्यसनाचे दुष्परिणाम इत्यादी मूल्यांचे शिक्षण प्रत्यक्ष भाषणातून दिले, तर ते रटाळ, नीरस वाटेल; परंतु कथेच्या माध्यमातून दिल्यामुळे स्पष्ट न बोलताही त्या कथेतून मूल्यांचे शिक्षण आपला प्रभाव टाकून जाते.

### ३.३.४ समूह संपर्क माध्यमांच्या मर्यादा

(१) चुकीचा संदेश, संदिग्ध माहिती पसरवली जाण्याची शक्यता असते.

(२) जाहिरातबाजीमुळे व्यापारीकरण होते.

(३) मनोरंजनाची पारंपरिक साधने व कलाप्रकार मागे पडतात.

(४) प्रसारमाध्यमांना हाताशी धरून राजकीय शक्ती त्यांचा दुरुपयोग करतात.

(५) माध्यमांमुळे समाजात अतिरंजकपणा व भडकपणा रुजवला जातो.

(६) चुकीची धोरणे व मूल्ये सर्वत्र चटकन पसरवली जाऊ शकतात.

(७) अभिरुचीहीन व दर्जाहीन कार्यक्रमांमुळे टीव्हीबाबत सामाजिक व सांस्कृतिक दुष्परिणाम संभवतात.

(८) समूह संपर्क माध्यमांच्या अतिरेकामुळे संस्कृतीवर आक्रमण होऊन सामाजीकरणाचा ऱ्हास होतो.


(९) समूह संपर्क माध्यमांच्या अतिवापरामुळे अध्ययनशीलतेचा ऱ्हास होतो.

(१०) विद्यार्थी व्यावहारिक ज्ञानापासून व आदर्श जीवनापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(११) माध्यमांमधून मिळणारी प्रसिद्धी हे दुधारी शस्त्र असते. माध्यमांद्वारे पटकन नावलौकिक मिळतो, त्याचप्रमाणे टीका झाल्यास बदनामीही पटकन व मोठ्या प्रमाणावर होते.

समूह संपर्क माध्यमे ही ज्ञानप्राप्ती व मनोरंजन या दोन्ही दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरत आहेत. शहरी व ग्रामीण, सुशिक्षित व अशिक्षित, गरीब व श्रीमंत, नोकरदार व व्यावसायिक या व अशा सर्वच प्रकारच्या व्यक्तींच्या दैनंदिन जीवनावर या माध्यमांचा सतत प्रभाव पडत आहे. शैक्षणिकदृष्ट्याही या माध्यमांचे महत्त्व व उपयुक्तता सार्थ आहे.

**शब्दकोडे पूर्ण करा**




**✻ उभे शब्द ✻**

(१) परीक्षेचे आवेदन या माध्यमाद्वारे केले जाऊ शकते.

(३) विविध कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याकरिता या तंत्रज्ञानाचा उपयोग होतो.

(५) माध्यमिक स्तरावर परीक्षेस उपयुक्त सामग्री या माध्यमाद्वारे प्रकाशित करण्यात येते.

**✻ आडवे शब्द ✻**

(२) याद्वारे मुक्त विद्यापीठाचे अनेक कार्यक्रम प्रक्षेपित केले जातात.

(४) नैतिक मूल्ये आणि आदर्शांचे पोषण करण्यासाठी याचा चांगला फायदा होऊ शकतो.

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

(१) सामाजीकरण ही एक ............ प्रक्रिया आहे
(अ) सामाजिक (ब) मानसिक
(क) सांस्कृतिक (ड) आर्थिक

(२) समाजरचनेमध्ये होणारे इष्ट बदल म्हणजेच ............ होय.
(अ) सामाजीकरण (ब) सामाजिक परिवर्तन
(क) सामाजिक नियंत्रण (ड) सांस्कृतिक परिवर्तन

(३) लोकशिक्षणाचे ............ हे प्रभावी माध्यम आहे.
(अ) दूरदर्शन (ब) वृत्तपत्रे
(क) पुस्तके (ड) नियतकालिके

(४) बदलते आधुनिक संप्रेषण तंत्रज्ञान हे सामाजिक परिवर्तनातील ............ घटकाचे उदाहरण आहे.
(अ) चळवळी (ब) औद्योगिक
(क) सांस्कृतिक (ड) शास्त्रीय व तंत्रज्ञानाधारित

(५) दूरपरिषद हे ............ प्रकारचे समूह संपर्क माध्यम आहे.
(अ) एकमार्गी दृक (ब) एकमार्गी श्राव्य
(क) दुविमार्गी दृक (ड) दुविमार्गी दृक्श्राव्य

**(ब) स्तंभ 'अ' आणि स्तंभ 'ब' यांतील योग्य सहसंबंध ओळखा व जोड्या जुळवा.**

| स्तंभ 'अ' | स्तंभ 'ब' |
|---|---|
| (१) नियतकालिके | (अ) वेब साधन |
| (२) आकाशवाणी | (ब) श्राव्य साधन |
| (३) दूरदर्शन | (क) मुद्रित साधन |
| (४) पॉडकास्ट | (ड) दृक्श्राव्य साधन |

**(क) एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) समान वयाच्या गटातील आंतरक्रियांतून सामाजीकरण करणारा घटक कोणता?
(२) शिक्षणात कायद्याने स्त्रीपुरुष समानता निर्माण होणे हे कशाचे उदाहरण आहे?

**(ड) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) सामाजीकरणाचा अर्थ सांगा.
(२) सामाजिक परिवर्तनाची व्याख्या लिहा.
(३) समूह संपर्क माध्यमे म्हणजे काय?
(४) मुद्रित साहित्य माध्यमाची दोन उदाहरणे लिहा.

**प्र.२ खालील विधानांबाबत तुमचे मत नोंदवा.**

(१) सामाजिक परिवर्तन हे गतिशील असते.
(२) आंतरजालाचे फायदे व तोटे दोन्ही असतात.
(३) प्रसार माध्यमातून मिळणारी प्रसिद्धी हे दुधारी शस्त्र असते.

**प्र.३ खालील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.**

| अ.क्र. | साधने | समूह संपर्क माध्यमाचा प्रकार | फायदे |
|---|---|---|---|
| (१) | वर्तमानपत्रे | ............. | (१) ..........<br>(२) .......... |
| (२) | दूरदर्शन | ............. | (१) ..........<br>(२) .......... |
| (३) | भ्रमणध्वनी | ............. | (१) ..........<br>(२) .......... |

| अ.क्र. | सामाजिक परिवर्तनाचे घटक | उदाहरणे |
|---|---|---|
| (१) | भौतिक घटक | (१) ..........<br>(२) .......... |
| (२) | शास्त्रीय व तंत्रज्ञानाधारित घटक | (१) ..........<br>(२) .......... |
| (३) | चळवळी | (१) ..........<br>(२) .......... |

**प्र.४ टिपा लिहा.**

(१) सामाजीकरणाचे महत्त्व
(२) सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप
(३) मुद्रित साहित्य माध्यमे
(४) समूह संपर्क माध्यमांचे फायदे

**प्र.५ खालील बाबींवर प्रत्येकी ५० ते ८० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) सामाजिक परिवर्तनाचे विविध घटक
(२) समूह संपर्क माध्यमांतील कोणतीही दोन वेब माध्यमे

**प्र.६ खालील प्रश्नांची प्रत्येकी १०० ते १५० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) सामाजीकरणात शिक्षणाची भूमिका विशद करा.
(२) समूह संपर्क माध्यमांचा अर्थ सांगून समूह संपर्क माध्यमांचे प्रकार स्पष्ट करा.
(३) सामाजिक परिवर्तनातील शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.